| | | |
|---|---|---|
| MHSN030045892016 | दाखल दिनांक | ०१/१२/२०१६ |
| | नोंदणी दिनांक | १४/१२/२०१६ |
| | निकाल दिनांक | ०४/०४/२०२६ |
| | कालावधी | ०९ वर्ष, ०४ महिने, ०३ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. ०४, सांगली यांचे न्यायालयात**

**(पिठासीन न्यायाधीश जुबेर शब्बीर मकानदार)**

गु.र.नं. २४७/२०१६, विश्रामबाग पोलिस ठाणे, सांगली.

| | |
|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली. |
| अभियोग पक्षामार्फत | सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. एम. पी. पाटील |
| आरोपी | **नाव – आदर्श रमेश मोहिते,**<br>वय– २९ वर्षे,<br>रा. रामकृष्ण परमहंस सोसायटी, पाचवी गल्ली, सांगली. ता. मिरज, जि., सांगली. |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. आर. एम. माने. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २७/०७/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | २८/०७/२०१६ |
| दोषारोप पाठवल्याचा दिनांक | ०१/१२/२०१६ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | ०८/०६/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०३/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | १६/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | ०४/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| **अ.नं** | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामिनावर सोडलेचा दिनांक** | **गुन्हा कलम** |
| १ | आदर्श रमेश मोहिते | २८/०७/२०१६ | -- | भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५. |

| ६ | ७ | ८ |
|---|---|---|
| **निर्दोष सोडले अथवा शिक्षा दिली** | **ठोठावलेली शिक्षा** | **संपरीक्षेदरम्यान आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याचा कालावधी** |
| निर्दोष मुक्तता | --- | --- |

## भाग क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| पी. डब्ल्यू-१ | झाकीरहुसेन इकबाल काझी | फिर्यादी |
| पी. डब्ल्यू-२ | फारूख शौकत नदाफ | पंच |

| | | |
|---|---|---|
| पी.डब्ल्यू–३ | पृथ्वीराज मधुकर कांबळे | साक्षीदार |
| पी.डब्ल्यू–४ | निवास शंकर माने | साक्षीदार |
| पी.डब्ल्यू–५ | वसंत किरवे | तपासी अंमलदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी–१/पी.डब्ल्यू–१ | फिर्याद |
| २. | पी–२/पी.डब्ल्यू–२ | दिनांक २७/०७/२०१६ रोजीच्या जप्ती पंचनाम्यांवरील अ.क्र. १ वरील पंचांची सही |
| ३. | पी–३/पी.डब्ल्यू–२ | दिनांक २८/०७/२०१६ रोजीच्या घटनास्थळ पंचनाम्यांवरील अ. क्र. १ वरील पंचांची सही |
| ३. | पी–४/पी.डब्ल्यू–५ | जप्ती पंचनामा |
| ४. | पी–५/पी.डब्ल्यू–५ | मुद्देमाल पावती |
| ५. | पी–६/पी.डब्ल्यू–५ | गुन्हा तपासण्याचा लेखी आदेश |

| | | |
|---|---|---|
| ६. | पी–७/पी.डब्ल्यू–५ | घटनास्थळ पंचनामा |
| ७. | पी–८/पी.डब्ल्यू–५ | आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात पाठवण्याकरीता उपविभागीय अधिकारी सांगली यांना दिनांक ३०/०९/२०१६ रोजी केलेले पत्र |

**ब. बचाव**

| अ.नं | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन निशाणी**

| अ.नं | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.नं | वस्तु क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | वस्तुक्रमांक अ | जप्त मुद्देमाल चाकु |

## न्यायनिर्णय

## (घोषीत दिनांक ०४/०४/२०२६)

**१.** उपरोक्त आरोपीच्या विरूध्द भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ खाली शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरून संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन –</u>**

२. जाकिरहुसेन इकबाल काझी पोकॉ/२०७७ (फिर्यादी) हे दिनांक २७/०७/२०१६ रोजी विश्रामबाग पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असताना मा. पोलीस निरीक्षक सो विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी पोलीस कर्मचारी यांना गुन्हेगार शोध मोहिम करणेबाबत आदेश करीत असल्याने विश्रामबाग पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील ते, तसेच पोहेकॉ किर्वे, पोना कांबळे, पोकॉ तांबोळी, पोकॉ माने असे सर्वजण खाजगी मोटार सायकलवरून पेट्रोलिंग करत असताना हनुमान नगर ते विठ्ठल नगर जाणा–या रोडच्या कडेला एक इसम संशयितरित्या बसलेला दिसून आला. सदर इसमाचा त्यांना संशय आल्याने त्यांनी त्याच्याजवळ जाऊन त्याचे नाव गाव विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. म्हणून सदर इसमाची त्यांनी अंगझडती घेण्याकरीता दोन पंचांच त्या ठिकाणी बोलावले व त्यानंतर त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आदर्श रमेश मोहिते, वय – १९ वर्षे, रा. रामकृष्ण परमहंस सोसायटी, पाचवी गल्ली, सांगली असे सांगितले.

३. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला असलेल्या पॅन्टच्या पट्टयास एक १० इंच लांबीचा टोकदार पात्याचा लोखंडी चाकू मिळून आल्याने सदर घातक शस्त्र पोहेकॉ किर्वे यांनी जप्त करून त्यावर पंचांचे व पोलीसांचे सहीचे कागदी लेबल लावले. मा. जिल्हाधिकारी साहेब, सांगली यांच्याकडील आदेश क्र. गृह–१/कार्या–६/एमएजी/बंदी आदेश/एसआर–१९/२०१६, दिनांक २६/०७/२०१६ अन्वये संपुर्ण जिल्हयात दिनांक २७/०७/२०१६ चे १०.०० वाजता पासून ते दिनांक ०८/०८/२०१६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) चा आदेश लागू

असून सदर आदेशाचा भंग करून आरोपी आदर्श मोहिते याने वर नमूद घातक शस्त्र बाळगले म्हणून फिर्यादी यांनी त्याच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद दाखल केली.

**दोषारोप व आरोपीचे म्हणणे –**

**४.** सदर गुन्हयाचा तपास हा व्ही. डी. किर्वे, पोहेकॉ/४७८ यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदाराचे जबाब नोंदविले व तपास अंति दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले.

**५.** सदर आरोपीविरूध्द भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दोषारोप निशाणी क्र. १२ ला ठेवण्यात आले. सदरचे दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेत वाचून दाखविले. आरोपीने गुन्हा मान्य नसलेचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली. सदर आरोपीविरूध्द फौ. प्र. सं. कलम ३१३ प्रमाणचे निवेदन निशाणी क्र. ४१ वर नोंदवण्यात आले आहे.

**६.** उभय पक्षाचे विरोधी कथनावरुन न्यायालयासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेः–

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि. २७/०७/२०१६ रोजी २२.३० वाजणेचे सुमारास हनुमान नगर ते विठ्ठलनगरकडे जाणा–या रोडवर, विश्रामबाग, सांगली आरोपी हा विनापरवाना त्याच्या ताब्यात चाकू हे घातक शस्त्र बाळगल्याचे मिळून आला आणि त्यायोगे **भारतीय हत्यार अधिनियम कलम ४ सहकलम २५ अन्वये अपराध केला?** | **.....नाही** |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी याने मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील हत्यारबंदी आदेशाचा भंग करुन स्वतःजवळ धारदार चाकू कब्जात बाळगले परिस्थितीत मिळुन आला आणि त्या योगे महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे **शिक्षापात्र कलम १३५ प्रमाणे गुन्हा केला?** | **.....नाही** |
| ३. | **काय आदेश ?** | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एम. पी. पाटील व आरोपीतर्फे वकील श्री. आर. एम. माने यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबतः–**

८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने प्रस्थापित करणे गरजेचे आहे की, आरोपी हा मा. जिल्हाधिकारीसाो, सांगली यांचा बंदी आदेश असताना आपल्या कब्जात विनापरवाना चाकू हे घातक शस्त्र बाळगल्याचे असताना मिळून आला.

९. सदर बाब सिध्दीकरीता अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून फिर्यादी झाकीरहुसेन इकबाल काझी यांस निशाणी २५ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २७/०७/२०१६ रोजी विश्रामबाग पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. त्यावेळी ते

गुन्हे प्रकटीकरण शाखेत काम करत होते. त्यादिवशी रात्री २२.३० वाजताच्या दरम्यान पोलीस हवालदार/४७८ श्री. किरवे, पोना. कांबळे, पोकॉ. तांबोळी, पोकॉ/१५१२ माने व ते असे पेट्रोलिंग करत असताना हनुमान नगर ते विठ्ठल नगर रस्त्याला आण्णा सदगोंडा पाटील यांच्या मोकळया प्लॉटमध्ये एक इसम संशयीतरित्या बसलेला त्यांना दिसला. त्यावेळी त्याला नाव गाव विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यावेळी त्यांनी जवळच असणाऱ्या दोन पंचाना बोलावून घेतले. त्यांच्या समक्ष त्याला नाव विचारले असता त्याने त्याचे नांव आदर्श रमेश मोहिते, रा. रामकृष्ण परमहंस सोसायटी सांगली असे सांगितले.

१०. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, सदर इसमाची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला लोखंडी पाते असलेला दातऱ्याचा चाकू ज्याला सिल्वर रंगाची मुठ होती असा मिळून आला. सदर चाकूचा पंचासमक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला. त्यावेळी मा. जिल्हाधिकारी यांचा बंदी आदेश असल्याने सदर इसमास ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणले व त्यांनी सरकारपक्षातर्फे फिर्याद दिली. त्यांना सदरची फिर्याद दाखवली असता त्यांनी त्यातील मजकूर व त्यावरील त्यांची स्वाक्षरी मान्य केल्याने सदर फिर्यादीस निशाणी पी–१ देण्यात आली आहे. तसेच सदर फिर्यादी साक्षीदार यांना सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल चाकू दाखवला असता त्यांनी न्यायालयासमक्ष तो ओळखल्याने सदर मुद्देमालास वस्तुक्रमांक अ देण्यात आले आहे. तसेच आरोपीला पाहिल्यास देखील ते ओळखू शकत असल्याचे त्यांनी कथन केले आहे.

११. सदर फिर्यादी साक्षीदार यांचा आरोपीच्या विधीज्ञांमार्फत उलटतपास घेण्यात आला. सदर फिर्यादी साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये सदर प्रकरणात

पेट्रोलींग करण्यासाठी जाताना स्टेशन डायरीमध्ये त्याबाबत नोंद केली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच सदर घटनास्थळाचा रस्ता हा रहदारीचा असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.  आरोपीकडून कोणताही चाकू जप्त करण्यात आला नसून बेवारस मुद्देमालाच्या आधारे सदर फिर्याद दाखल केली असल्याचे त्यांनी नाकारले आहे.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ फारूख शौकत नदाफ यांना निशाणी क्र. २६ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे या खटल्यातील पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये दिनांक २७/०७/२०१६ व दिनांक २८/०७/२०१६ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता बोलावले नसल्याचे व त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा पोलीसांनी केला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांना सदर जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यावरील अ. क्र. १ वरील त्यांची सही असल्याचे मान्य करून त्यातील मजकूर नाकारला आहे. तसेच सदर घटनास्थळ पंचनामा त्यांना दाखवला असता त्यांनी त्यावरील अ. क्र. १ वरील सही त्यांची असल्याचे व त्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुतचा साक्षीदार हा अभियोगपक्षाचे समर्थन करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांस उत्तरसुचक प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ पृथ्वीराज मधुकर कांबळे यांना निशाणी क्र. ३३ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २७/०७/२०१६ रोजी ते विश्रामबाग पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत असताना पोलीस निरीक्षक यांनी शहरातील अवैध धंदयावर कार्यवाही करण्याचा आदेश दिला होता. त्याप्रमाणे ते, पोहेकॉ किरवे, पोकॉ

तांबोळी, पोकॉ काझी असे गस्त घालत हनुमाननगर या ठिकाणी गेले होते. हनुमान नगर ते विठ्ठलनगर येथे ते खाजगी दुचाकीवरून जात असताना त्यांना विठ्ठलनगर रोडवर एक इसम रस्त्याच्या कडेला बसलेला दिसला. त्यावेळी त्यांनी त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांने उडवाउडवीची उत्तरे दिली व तो पळू लागला. सदर इसमास पकडून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आदर्श रमेश मोहिते, वय–१९ वर्षे असे त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी सदर इसमाची झडती घेतली असता त्याच्याकडे चाकु मिळून आला. सदर चाकु साधारणपणे १० इंच लांबी असलेला व एका बाजूला दातरे असलेला होता. त्यानंतर आरोपी आदर्श मोहिते याला विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये घेऊन आले व पोकॉ काझी यांनी सदर आरोपीविरुध्द फिर्याद नोंदवली. सदर साक्षीदाराने वरील सर्व बाबी या शपथेवर कथन केल्या आहेत. तसेच आरोपीला देखील न्यायालयासमक्ष ओळखले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला नसल्याने आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ निवास शंकर माने यांना निशाणी क्र. ३६ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासणीमध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २८/०७/२०१६ रोजी ते गुन्हे प्रकटीकरण शाखा सांगली येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असताना ते, किरवे, कांबळे, तांबोळी, काझी असे गस्त घालण्याकरीता खाजगी वाहनाने विठ्ठलनगर हनुमाननगर या रोडवर जात असताना त्यांना एक संशयित इसम आढळून आला. सदर इसमाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष सदर इसमाची झडती घेतली असता त्याच्याकडे हत्यार आढळून आले. त्यावेळी सदर इसमास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आदर्श रमेश

मोहिते असे सांगितले. त्याच्याकडे मिळून आलेले हत्यार हे १० इंचाचा चाकूसारखे होते. त्यानंतर किरवे यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर आरोपीस त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

**१५.** सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये पोलीस ठाण्यातून बाहेर पडताना त्यांनी स्वतः स्टेशन डायरीला कोणतीही नोंद केली नसल्याचे मान्य केले आहे. हनुमान नगर ते विठ्ठलनगर येथे राहती वस्ती असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदर घटनेवेळी ते सदर ठिकाणी उपस्थित नसल्याचे त्यांनी नाकारले आहे.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ वसंत किरवे यांना निशाणी क्र. ३९ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे या खटल्याचे तपासी अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २७/०७/२०१६ रोजी ते विश्रामबाग पोलीस ठाण्यात पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असताना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी त्यांना पोलीस ठाणे हद्दीत आरोपींचा शोध मोहिम घेण्याकरीता सांगितले होते. त्याकरीता ते व गुन्हा प्रकटीकरण शाखेचे कर्मचारी असे मोटारसायकलवरून पोलीस ठाणे हद्दीत रवाना झाले होते. पेट्रोलींग करत असताना हनुमान नगर ते विठ्ठलनगर जाणा–या रोडवर आण्णा सत्यगोंडा पाटील यांच्या शेतामध्ये रोडच्या कडेला एक इसम संशयीतरित्या उभ्या असलेला दिसून आल्याने त्यांनी त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आदर्श रमेश मोहिते असे सांगितले.

**१७.** सदर इसमाचा संशय आल्याने दोन पंचांना बोलावून त्यांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला असलेल्या बेल्टला एक लोखंडी चाकू मिळून आला व त्यांनी सदर लोखंडी चाकू दोन पंचांसमक्ष पंचनामा करून जप्त केला

असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांना दिनांक २७/०७/२०१६ रोजीचा जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यातील मजकूर व त्यावरील त्यांची स्वाक्षरी मान्य केल्याने सदर पंचनाम्यास निशाणी क्र. पी–४ देण्यात आली आहे. त्यानंतर सदर घटनेतील जप्त मुद्देमाल त्यांनी मुद्देमाल कारकुनाकडे यांच्याकडे पावती करून जमा केला. सदर मुद्देमाल पावती त्यांनी मान्य केल्याने सदर पावतीस निशाणी पी–५ देण्यात आली आहे.

**१८.** पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, पोलीस ठाण्यात आल्यावर पोलीस कॉन्स्टेबल काझी यांनी सरकारपक्षातर्फे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. त्यानंतर आरोपीची वैदयकीय तपासणी करून आरोपीला प्रस्तुत गुन्हयात अटक करण्यात आली. वर्दी दाखल करून मपोकॉ खाडे यांनी सदर गुन्हयाचा पुढील तपास करण्याचा त्यांना लेखी आदेश दिला. त्यांना सदर लेखी आदेश दाखवला असता त्यांनी तो मान्य केल्याने सदर आदेशास निशाणी क्र. पी–६ देण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असल्याचे सांगितले आहे. दिनांक २८/०७/२०१६ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यातील मजकूर व त्यावरील सही मान्य केल्याने सदर पंचनाम्यास निशाणी पी–७ देण्यात आली आहे. सदर तपासादरम्यान पोलीस ठाण्यातील इतर कर्मचारी हे सदर घटनेचे साक्षीदार असल्याने त्यांचे तपासटिपण त्यांनी या कामी नोंदवले होते.

**१९.** त्यानंतर सांगली जिल्हयात शस्त्र बाळगण्यास बंदी आदेश लागू असल्याबाबतचा मा. जिल्हाधिकारी सांगली यांचा आदेश तपासकामी हजर केला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा प्राप्त झाल्याने आरोपीविरुध्द सदर दोषारोपपत्र दाखल करण्याकरीता उपविभागीय अधिकारी

सांगली यांची परवानगी घेऊन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात पाठवण्यात आले असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांना दिनांक ३०/०९/२०१६ रोजीचे उपविभागीय अधिकारी यांची परवानगी घेण्याकरीता करण्यात आलेले पत्र दाखवण्यात आले असता त्यांनी ते मान्य केल्याने सदर पत्रास निशाणी पी–८ देण्यात आली आहे. आरोपीला त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे. तसेच आरोपीकडून जप्त करण्यात आलेला चाकू देखील त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखला आहे.

२०. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये त्यांनी स्टेशन डायरीमध्ये व्यक्तीशः कोणतीही नोंद केली नसल्याचे मान्य केले आहे. घटनास्थळावरील रोड हा राहत्या वस्तीचा रोड असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. आजूबाजूंच्या लोकांचे या कामी जाबजबाब नोंदवले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. जप्त मुद्देमाल हा सहजपणे कोठेही उपलब्ध होत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी घटनास्थळाच्या चतुःसीमा पंचनाम्यात नमूद केल्या जात असल्याचे मान्य करून सदर खटल्यातील घटनास्थळ पंचनाम्यावर चतुःसीमा नमूद केल्या नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या वर्दीजबाबामध्ये पंचांची नावे नमूद नसल्याचे देखील त्यांनी मान्य केले आहे.

२१. प्रस्तुत प्रकरणात पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर कामी तपासण्यात आलेले सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. साक्षीदार क्र. २ फारूख शौकत नदाफ हे पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. परंतु त्यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. सदर पंच साक्षीदाराने त्याच्यासमक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे व पोलीसांनी सांगितलेल्या कागदावर त्यांनी सही केली असल्याचे कथन केले आहे. तसेच तपासी अंमलदार यांनी पंचनाम्यामध्ये

घटनास्थळाच्या चतुःसीमा नमूद करणे आवश्यक असल्याचे मान्य करून सदर खटलयातील पंचनाम्यावर तशा घटनास्थळाच्या चतुःसीमा नोंद केल्या नसल्याच्या तसेच पंच साक्षीदारांची नावे देखील पंचनाम्यामध्ये नमूद केली नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे पंचनामा करण्यात आला होता किंवा कसे व तो घटनास्थळी करण्यात आला होता याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. घटनास्थळ हा रहदारीचा रस्ता असून देखील अभियोगपक्षाने सदर कामी स्वतंत्र व त्रयस्थ साक्षीदार का तपासला नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण न्यायालयासमोर आणलेले नाही. अभियोगपक्षास वारंवार साक्षीदार तपासून पुरावा देण्याकरीता संधी देवूनही अभियोगपक्ष पुढील साक्षीदार तपासण्यास अपयशी ठरला आहे. तसेच अभियोगपक्षातर्फे सदरचा खटला आरोपीविरुध्द सिध्द करण्याकरीता महत्त्वाचे असलेले भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, सहकलम २५ याच्या प्रतिबंधासंबंधात अभिलेखावर कोणतेही दस्तऐवज सादर केलेले नाहीत. तसेच पुराव्याकामी कोणताही बंदी आदेश अभियोगपक्षाने शाबित केलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणेचा गुन्हा आरोपीविरुध्द शाबित करण्यास अभियोगपक्ष असमर्थ ठरला आहे.

२२. अशा परिस्थितीत वरील सर्व बाबींचा विचार करता अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा सबळ नसून आरोपीने विनापरवाना शस्त्र कब्जामध्ये बाळगून मा. जिल्हाधिकारी सो यांच्या बंदी आदेशाचे उल्लंघन केले ही बाब अभियोगपक्ष सिध्द करू शकला नाही. फौजदारी कायद्याच्या तत्वानुसार आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावरती असते. प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्यामध्ये अभियोगपक्षाला अपयश आले आहे. याउलट, खटल्याच्या सुनावणी दरम्यान

न्यायालयासमोर आलेल्या बाबी लक्षात घेता आरोपीला संशयाचा फायदा देणे योग्य होईल. त्यामुळे मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र. ३ करीता खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १ | आरोपी **आदर्श रमेश मोहिते** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपींचा जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | जप्त मुद्देमाल एक लोखंडी पाते असणारा चाकु त्याचे पुढील पाते १० इंच लांबीचे पुढे निमुळते होत गेलेले समोरील बाजूस टोकदार असलेले पातेचे वरील बाजूस ९ धारदार दातरे असलेले त्याचे पाठीमागील बाजूस सिल्वर रंगाची ४ इंच मुठ त्याचे मागील बाजूस गोल चकती हा जिल्हाधिकारी यांच्याकडे विल्हेवाटीकरीता निर्गमित करण्यात यावा. |
| ४ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रुपये २५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व जामीन द्यावे. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

JUBER SHABBIR MAKANDAR

Digitally signed by JUBER SHABBIR MAKANDAR
Date: 2026.04.04 17:33:40 +0530

**सांगली.** **(जुबेर शब्बीर मकानदार)**

**दि. ०४/०४/२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ०४, सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment is same word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the stenographer | : | P. D.Tingare |
| (b) | Court | : | J. S. Makandar<br>04th Jt.Civil Judge Jr.Dn.&<br>J.M.F.C.,Sangli |
| (c) | Judgment/Order signed by P.O. on | : | 04/04/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | : | 04/04/2026 |